SCHEDULE 2

( See Regulation 2. 1. 1 and Regulation 2.1.7 )

# Form "A"

Application for Registration / Renewal of Registration under Food Safety and Standards Act, 2006

**नोंदणी / नोंदणीचे नुतनीकरणासाठी अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत अर्ज**

| |
|---|
| अर्जदाराचे छायाचित्र. Photograph of Applicant |

**Kind of business** : **व्यवसायाचा प्रकार.**

- Permanent / Temporary Stall holder.
  स्थायी / अस्थायी स्टॉल धारक.
- Hawker (Itinerant / Mobile food vendor )
  फिरता विक्रेता/ हातगाडी.
- Home based canteens/dabba wallas
  घरगुती भोजनालय/डबेवाले.
- Petty Retailer of snacks/Tea shops
  किरकोळ नाश्ता विक्रेते./ चहा दुकाने
- Manufacturer/Processor
  उत्पादक / प्रक्रिया उद्योग
- Re Packer
  रिपॅकर
- Food Stalls/arrangements in Religious Gatherings, fairs etc.
  धार्मिक स्थळे/मेळावे / यात्रेच्या ठिकाणी असलेली आस्थायी अन्न पदार्थांची दुकाने /व्यवस्था
- Milk producers ( who are not member of Dairy co operative society)/ milk vendor
  दूध उत्पादक (ज्या व्यक्ती सहकारी दूध संस्थेचे सभासद नाहीत असे)/ दूध विक्रेते.
- Dhaba
  ढाबा.
- Fish/meat/poultry shop /seller
  मासे / मांस/ पोल्टी शॉप /विक्रेते

..२/--

- Other (s) , please specify :
  इतर, असल्यास कृपया नमूद करावे.

(a) Name of the Applicant /Company :
अर्जदाराचे / कंपनीचे नाव

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

(b) Designation
- Individual
- Partner
- Proprietor
- Secretary of dairy co-operative society
- Others ( Please specify )

पदनाम.

- वैयक्तीक
- भागीदार
- मालक
- सचिव सहकारी दूध संस्था/ संघ
- इतर (कृपया नमुद करावे. )

( c ) Proof of Identity of applicant
अर्जदाराचा ओळखीबाबत पुरावा

-----------------------------------------------------------------------------------------------

( Not : Please submit a copy of photo ID like Driving License, Passport, Ration Card or Election ID card )

-----------------------------------------------------------------------------------------------

( टीप : आधार कार्ड/ वाहन परवाना /पासपोर्ट /शिधापत्रीका / निवडणूक ओळखपत्राची प्रत सादर करावी )

(d) Correspondence address :
पत्रव्यवहारचा पत्ता :

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

Tel. No. दूरध्वनी क्र. ----------------- Mobile No. भ्रमणध्वनी -----------------------------
Fax No. ------------------------------- Email ----------------------------

( Note : In case the number (s) are a PP or common number (s), please specify the name of the contact person as well )
वैयक्तीक दूरध्वनी नसल्यास / सार्वजनिक क्रमांक असल्यास कृपया संपर्क साधावयाचे व्यक्तीचे नाव नमूद करावे.

(e) Ares or Location where food Business is to be conducted / Address of the premises
अन्न व्यवसायाच्या करावयाचा जागेचा संपूर्ण पत्ता (भाग/प्रभाग/वॉर्ड / घरक्रमांक इ. )अथवा स्थळ

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

(f) Description of the food items proposed to be Manufactured or sold :
ज्या अन्न पदार्थांची विक्री अथवा उत्पादन करावयाचे आहे त्याचा तपशिल.

| Sr.No. | Name of Food category | Quantity in kg per day or M.T. per annum |
|---|---|---|
| अ.क्र. | अन्न पदार्थांची वर्गवारी | किलो प्रतिदिन किंवा मेट्रीक टन प्रतिवर्ष उत्पादन क्षमता |

Please attach separate sheet if required.
आवश्यक असल्यास स्वतंत्र कागदावर नमूद करावे.

(g) Total Annual turnover from the food business, if existing, alongwith any supporting document (s) showing proof of income ( In case of renewal )
सध्या अस्तीत्वात असलेल्या पेढीची वार्षिक उलाढाल रु. ------------------
( योग्य त्या कागदपत्रांच्या आधाराच्या पुराव्यासहीत नुतनीकरणासाठी असल्यास, उत्पन्नाचा पुरावा.)

(h) In case of new business – Intended date of start :
नविन व्यवसायिकांनी व्यवसाय सुरु करण्याची संभाव्य तारीख.

(i) In case of seasonal business, state the opening and closing period of the year :
ऋतूमानाप्रमाणे व्यवसाय असतील तर सुरु व बंद होण्याचा कालावधी.

(j) Source of Water supply :
1. Public supply 2. Private supply
3. Any Other source

पाणी पुरवठयाचा स्त्रोत
१. सार्वजनिक २. खाजगी ३. इतर स्त्रोत.

(k) Whether any electric power is used in manufacture of the food items :

Yes

No

अन्न पदार्थ उत्पादनाकरिता विज वापरली जाते काय

होय

नाही.

If yes, please state the exact HP used or sanctioned Electricity load :
जर वापरत असल्यास किती अश्वशक्ती / विजेचा दाब मंजूर करण्यात आला आहे.

(i) I/We have forwarded a sum of Rs. ----------------------- towards registration fees according to the provision of the Fppd Safety and Standards ( Licensing and Registration ) Regulation, 2011 vide :
मी /आम्ही अन्न सुरक्षा व मानदे कायदा (अनुज्ञप्ती व नोंदणी )अधिनियम २०११ अंतर्गत नोंदणी शुल्क रु. ---------------------------------- रक्कम यासोबत खालीलप्रमाणे पाठविली आहे.

- Demand Draft No.
  डिमांड ड्रॉफ्ट नांवे

  ( payable to

- Cash /
  रोख

Place स्थळ :
Date दिनांक :

( Signature of the Applicant )
अर्जदाराची सही.

# Food and Drug Administration, Maharashtra State

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
महाराष्ट्र शासन
**FOOD SAFETY & STANDARDS ACT, 2006**
अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६
**REGISTRATION**
नोंदणी प्रमाणपत्र.
**[See Regulation 2.1.1 (5) ]**
[ नियमावली २. १. १ (५ ) ]

**Registration No.**
**नोंदणी क्रमांक** | | | | | | | | | | | | | |

Photograph of Applicant
अर्जदाराचे छायाचित्र

1. Name & Address of Food Business Operator.
   अन्न व्यवसाय चालकाचे नाव व पत्ता.
2. Address of Food Business ( If Applicable )
   अन्न आस्थापनेचा पत्ता (लागू असल्यास )
3. Kind of Business
   व्यवसायाचा प्रकार
4. Previous M.P.F.A. Licence No. ( If Applicable )
   पूर्वीचा महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक परवाना क्रमांक (असल्यास )
5. The Registration certificate is granted under and is subject to the provisions of Food Safety Standards Act 2006, Rule and Regulation 2011 which must be complied with by the Registered Food Business Operator.
   सदरचे नोंदणी प्रमाणपत्र हे अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६, नियम २०११ व नियमनच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत असून त्यातील तरतुदींचे पालन करणे नोंदणीकृत अन्न व्यवसायिकास अनिवार्य आहे.
6. Food Business operator shall follow/ practice all requirements mentioned in Part-I of Schedule -4 of Food Safety & Standards ( Licensing & Registration of Food Business) Regulation 2011.
   अन्न सुरक्षा व मानदे (अन्न व्यवसायाची नोंदणी व परवाने ) नियमन २०११ चे परिशिष्ट-४ चे भाग- १ मध्ये दर्शविलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

This is merely a registration certificate and not a License. It does not bestow any property right or any other rights as regards ownership of structure or land etc. or confer any right of ownership.
हे फक्त नोंदणीपत्र असून परवाना नाही. नोंदणीकृत संस्थेस किंवा व्यक्तीस झालेल्या बांधकामासंबंधी किंवा जागेसंबंधी कोणताही मालकी हक्क अथवा इतर कोणतेही हक्क प्राप्त होत नाही किंवा या नोंदणीद्वारे व्यक्तीस / संस्थेस कुठलीही मालकी प्राप्त होत नाही, याची नोंद घ्यावी.

Registered firm/ Person will be governed and abide by all orders issued as and when by any court constiued by law in India Specifically Session court / High Court/ Supreme Court etc.
नोंदणी धारक / संस्था /व्यक्ती ही कायदयाने प्रस्तावित केलेले कोणतेही न्यायालय जसे की /जिल्हा सत्र न्यायालय/ उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालय इत्यादींच्या वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे.

Place :
स्थळ :

Stamp & Sign. Of Registering Authority
नोंदणी प्राधिकारी यांचे शिक्का व स्वाक्षरी.

**Validation and Renewal**

| Registration/Renewal Date<br>नोदणी / नुतनीकरण दिनांक | Period of Validity<br>विधीग्राहयतेचा कालावधी | Registration Fee Paid<br>अदा केलेले नोंदणी शुल्क | Name of Food Business<br>अन्न व्यवसायाचा प्रकार | Signature of Registering Authority<br>नोंदणी प्राधिकाराची सही. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

भाग १ - किरकोळ अन्न व्यवसायिकांनी अंगिकारवयाची स्वच्छता व आरोग्यकारक सामान्य मुददे

नोंदणीसाठी

पहा नियम [ २.१.१(२)]

अन्न उत्पादक/प्रक्रियाकर्ते/हाताळणा-यांसाठी आवश्यक स्वच्छता व आरोग्य कारक मुददे

ज्या जागेत अन्नाचे उत्पादन, प्रक्रिया व हाताळणी होते त्या ठिकाणी खालील मुद्यांची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) उत्पादनाची जागा ही स्वच्छतेच्या ठिकाणी असणे आवश्यक असून आजूबाजूचा परिसर घाणेरडया वातावरणापासून दूर असावा व आरोग्यकारक वातावरण ठेवणे बंधनकारक आहे. सर्व नवीन पेढयाी आपला व्यवसाय प्रदुषणरहित भागातच सुरु करावा.

२) ज्या ठिकाणी अन्न उत्पादन होते अशी जागा आवश्यकता पुर्ण करील इतकी मोठी असावी जेणेकरून, उत्पादन व साठा आरोग्यकारक वातावरणात राहिल.

३) जागा ही स्वच्छ, भरपूर हवा प्रकाश, व योग्य वायुजीवा असणारी व हालचाल करण्याकरिता मोकळी असणे गरजेचे आहे.

४) जमीन, छत व भिंती हे सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. त्याचा दर्शनीभाग हा गुळगुळीत, स्वच्छ करण्याजोगा असणे आवश्यक आहे व त्या ठिकाणी प्लास्टर अथवा रंगाचे पापुद्रे निघालेले नसावेत.

५) ज़मीन व भिंतीलगतची जागा ही प्रभावी किटकनाशक वापरुा किटकविरहित ठेवावी. उत्पादा चालू असतांना कोणत्याही प्रकारचे किटकनाशक फवारु नयेत. परंतु त्या ऐवजी त्या जागेत fly swats/flags चा वापर उडणाया कीटकासाठी करण्यांत यावा. खिडक्या, दारे व इतर उघडया जागांना बारीक जाळया बसवाव्यात, जेणेकरून, सदर जागा कीटकमुक्त राहील. उत्पादनासाठी वापरांत येणारे पाणी पिण्यायोग्य असावे, आवश्यक असल्यास सदरच्या पाणीची रासायनिक तथा जैविक चांचणी ही ठराविक अंतराने मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत करावी.

६) पिण्यायोग्य पाण्याचा सतत पुरवठा होईल याबाबत काळजी घ्यावी. पाण्याचा खंडित पुरवठा असल्यास पाणी कमी पडू नये म्हणून पाण्याच्या साटवणुकीची व्यवस्था करण्यांत यावी.

७) वापरण्यास लागणारी यंत्रे व साहित्य अशा प्रकारच्या बनावटीची असावी जेणेकरून, त्याची स्वच्छता सहजपणे करता येईल. भांडी टेबल तसेच यंत्रातील कार्यरत भाग इ. स्वच्छ करण्यासाठी पुरेशी व्यवस्था असावी.

८) अन्नाची प्रक्रीया, पॅकिंग, साठा करण्यास लागणारी पात्र, भांडी व इतर साधनसामग्री हि धातुसंसर्ग होवून आरोग्यास अपाय होईल अशी ासावी (तांबे व पितळी भांडयांना कल्हई केलेली असावी.)

९) व्यवसायाची वेळ संपल्यांतर सर्व साधनसामग्री ही धुवून स्वच्छ व कोरडी करुा ाीट मांडुा ठेवावी जेणेकरून, त्यास शेवाळे, बुरशी ई. लागण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१0) सर्व साधासामग्री जेणेकरुा तपासणी करताा अडथळा होणार ाही ही भिंतीपासून दूर ठराविक अंतरावर ठेवावी.

११) सांडपाण्याची प्रभावी व्यवस्था असावी आणि तेथे नाकारलेल्या/टाकावू वस्तुंची विल्हेवाटाची योग्य व्यवस्था असावी.

१२) प्रक्रिया व उत्पादन विभागात काम करणाया कामगारांना देण्यात आलेले कपडे (ॲपरॉन) डोक्यास टोपी आणि हातमोजे हे स्वच्छ असावेत.

१३) संसर्गजन्य आजार झालेल्या व्यक्तिला काम करण्यासाठी प्रतिबंध करावा. कामगारांना जखमा/दुःख झाले असतीलतर ते झाकलेली असावीत आणि सदर व्यक्तिस कोणत्याही प्रकारे अन्न पदार्थांच्या प्रत्यक्ष संपर्कात येवु देता कामा ाये.

१४) सर्व अन्न हाताळणारे कामगार यांची नखे कापलेली स्वच्छ असावी व त्यांनी त्यांचे हात साबण/सोडा व पाण्याने स्वच्छ धुतलेली असावी. सदर बाबी काम करण्यापूर्वी व प्रसाधन केल्यानंतर पाळण्यांत यावीत. अन्न हाताळतांनी अंग खाजवीणे , केस विंचरणे टाळावे.

१५) सर्व अन्न पदार्थ हाताळणाया व्यक्तींनी खोटी नखे,ढिले दागिने व इतर तत्सम वस्तु वापरू नयेत, त्या अन्न पदार्थात पडण्याची शक्यता आहे. तसेच अशा व्यक्तींनी अन्न पदार्थ हाताळतांना आपल्या चेहयाला व केसांना हात लावण्याचे टाळावे.

१६) अन्न पदार्थ हाताळतांना त्या परिसरामध्ये, अन्न पदार्थ खाणे, तंबाखु चघळणे/खाणे, धुम्रपान, थुंकणे, नाक शिंकरणे इत्यादी बाबी टाळाव्यात.

१७) विक्रीसाठी साठविलेले अन्न पदार्थ हे खाण्यासाठी योग्य असावेत तसेच दुषित होवु ाये म्हणुा झाकुण ठेवावेत.

१८) अन्न पदार्थ वाहतुकीसाठी वापरात येणारे वाहन स्वच्छ व सुस्थितीत असावे.

१९) अन्न पदार्थ वाहतुक करतांना ते पॅकबंद असावेत, व योग्य त्या तापमानातच त्याची वाहतुक करण्यांत यावी.

२0) किटकनाशके, जंतुनाशके हे अन्न पदार्थाच्या उत्पादनापासून/साठवणूकीपासून /साठवणूक कक्षापासून दूर व स्वतंत्र ठेवली व साठविली जावीत.

अ) पदपथावरील अन्न विक्रेते/दुकाो यांचेसाठी स्वच्छता व आरोग्य कारक सामाय मुददे, अन्न उत्पादक तसेच प्रक्रियाकर्ते वगळुा

१) कचरा सांडपाणी, प्रसाधनाच्या सोयी, खुली गटारे व मोकाट जनावरे अशी दुषित करणारी संभाव्य स्त्रोत टाळावीत.

२) हातगाडीचा पृष्ठभाग जो अन्न पदार्थ व अन्न साठविण्याची पात्रे इ च्या संपर्कात येतो तो घण, गंजणार ाही अशा धातु पासु बाविला जावा व तो स्वच्छ आणि सुस्थितीत ठेवावा.

२अ) ऊन, वारा, व धुळ या पासून संरक्षित ठेवावा. वापरात नसतांना हातगाडी स्वच्छ जागेमध्ये व्यवस्थित संरक्षित करून ठेवण्यांत यावी.

३. अन्न विक्री पेढी व हातगाडीवाल्याो अन्न पदार्थ तयार करतांना, देतांना व उपभोक्त्याने अन्न पदार्थ खावुा उरलेले अन्न व तयार झालेले टाकावू पदार्थ साठविण्याकरिता झाकण असलेली कचरापेटी ठेवावी.

४. हातगाडीचा अन्न पदार्थ संपर्कात येणारा भाग स्वच्छ, आरोग्यदायक व अभेदय , स्वच्छ करण्याकरिता सोपा स्टेनलेसस्टील सारखा असावा, आणि सदरची जागा जमिनीपासून ६0 ते ७0 सें.मी. उंच असावी.

५. विक्रीची जागा , बाके, छप्पर अथवा विक्रीची जागा आच्छादीत केलेला शामियाना, पेटया, कपाटे, ग्लास, ठेवण्यासाठीचा ट्रे स्वच्छ व नीट असावा.

६.	उत्पादनाकरिता वापरण्यात येणारी चिनीमातीची भांडी ही स्वच्छ आणि चांगल्या सुस्थितीत असावीत ती फुटकी ासावी.

७.	पेढी बंद करतांना सर्व पात्रे स्वच्छ धुतलेली व कोरडी करून ठेवावी जेणेकरून, त्यावर बुरशी, कवक ई. चा संसर्ग होणार नाही.

८.	अन्न पदार्थ तयार करण्यासाठी, धुण्यासाठी स्वच्छ करण्यासाठी वापरात येणारे पाणी हे पिण्यायोग्य असावे.

९.	पिण्याच्या पाण्याची वाहतुक करीत असतांना अच्छादित करुा वाहतुक करावी सदरचे पाणी जसे बाटलीबंद पाणी, उकळलेले किंवा गाळलेले पाणी इ. झाकणयुक्त पात्रात असावे व ते संरक्षीत पात्रात असावे आणि सदरची पात्रे अशा ठिकाणी साठवावी ज्या ठिकाणी धुर, धुळ अस्वच्छता ासावी.

१०.	अन्न पदार्थ तयार करण्यासाठी, साठा करण्यासाठी व ते वाढण्यासाठी वापरण्यात येणारी भांडी कॅडमियम सिसे ई. अथवा अखाद्य श्रेणीचे प्लॅस्टिक किंवा विषबाधा होईल असे असु नये.

११.	प्रत्येक प्रक्रियेनंतर पात्रे ही मळापासून स्वच्छ केलेली असावी, विसळलेली असावी, सोडया वापर करुा वाहत्या पाण्याखाली धुतलेली असावी. भांडी पुसण्यासाठी स्वच्छ कपडयाचा वापर करावा. हात पुसण्यासाठी, जागा स्वच्छ करण्यासाठी आणि जमीन पुसण्यासाठीचे कपडे हे टेबल साफ करण्याच्या जागी आणि भांडी पुसण्यासाठी वापरू नये. जेवण तयार करणारे, अन्न पदार्थ हाताळणारे अथवा वाढणाया व्यक्तिने आवश्यकतेनुसार हातमोजे टोपी, तोंड झाकणारी जाळी वापरावी.

१२.	उष्टे अन्न पदार्थ असलेली भांडी व थाळयांची सफाई कपडयाव्दारे कचरा पेटीतच करावी.

१३.	संसर्गजन्य रोग झालेल्या व्यक्तिंना काम करण्यास परवानगी देवू नये.

१४.	अन्न हाताळणाया व्यक्तिंनी स्वच्छ रहावे व स्वच्छ कपडे घालावे व त्यांनी त्यांची नखे व्यवस्थित कापून स्वच्छ ठेवावीत. तसेच काम करण्याआधी व प्रत्येकवेळी प्रसाधनानंतर व जेवणानंतर त्यांचे हात साबणाने स्वच्छ धुवावेत.

१५.	अन्न हाताळणाया सर्व व्यक्तिंनी सैल वस्तु अंगावर परिधान करू नयेत, ज्या अन्नात पडण्याची शक्यता असेल. तसेच डोके, चेहरा व केस खाजवू नये किंवा स्पर्शू नये.

१६.	विक्रीसाठी साठवलेले अन्न पदार्थ हे योग्यरित्या झाकलेले असावे. जेणेकरून, अन्न पदार्थाला होणारा संसर्ग टाळता येईल. अन्न पदार्थाची गळती रोखण्यासाठी खाद्यश्रेणीची प्लास्टीक भांडी अथवा स्टीलची भांडीच अन्न पदार्थ साठविण्याकरिता वापरावी.

१७.	परिसरात खाणे, चघळणे, धुम्रपान करणे, थुंकणे, व नाक शिंकरणे इत्यादी गोष्टींना प्रतिबंध करावा.

१८.	दररोज आवश्यक तेवढेच अन्नपदार्थ तयार करावेत. जेणेकरून ,जर अन्न पदार्थ शिल्लक राहिले तर ते दुसया दिवशी खाण्यायोग्य आहेत की नाही याची खातरजमा न करता परत वापरले जावू नये. उर्वरित अन्न पदार्थाचा साठा त्वरीत शीतपेटीत करण्यांत यावा.

१९. खाद्य पदार्थ साठा करण्यासाठी पुरेशा कप्प्यांची व्यवस्था असावी. जेणेकरून, खाद्यपदार्थ सहजपणे ओळखता येतील. खाद्यपदार्थाच्या प्रत्येक श्रेणीसाठी वेगवेगळया कप्प्यांची सोय असावी. जेणेकरून, अन्न दुषीतीकरण टाळता येईल.

२०. कचरापेटी ही मजबूत झाकणाची असावी. त्यातील कचरा हा दररोज ठरलेल्या ठिकाणी टाकावा.

२१. शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थ वेगवगळे ठेवण्यांत यावेत.

२२. शीतपेटी आठवडयातून किमान एकदा स्वच्छ करावी. जेणेकरून, त्यामधील डाग, बर्फाचे तुकडे आणि अन्नकणही साफ होतील. शीतपेटीचे तापमान हे ४° C ते - ६° C असावे.

२३. विक्रीचे स्थान हे स्थानिक प्राधिकारी यांनी मान्यता दिलेले असावे. जेणेकरून, वाहतुकीची कोंडी होणार नाही अथवा पादचायांना अडथळा होणार नाही अथवा ते अनारोग्य ठिकाणी असणार नाही.

**Food and Drug Administration, Maharashtra State**

Form "B"

( See Regulation 2.1.2, Regulation 2.1.3 and Regulation 2.1.7)

Application for License / Renewal of license under Food Safety and Standards Act, 2006

फॉर्म - "ब"

**अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम २००६ अंतर्गत परवाना / परवाना नुतनीकरणासाठी अर्ज**

( नियमन क्र. २.१.२, २.१.३ आणि २.१.७ पहावे )

**Kind of business** **(Please tick more than one, if applicable )**

**व्यवसायाचा प्रकार. (आवश्यक ते नुसार ✓ निशाणी करावी.)**

- Manufacturing / Processing including sorting, grading etc.
  उत्पादन /प्रक्रीया, जसे की निवडणे, प्रतवारी करणे इत्यादी.
- Milk Collection/Chilling.
  दूध संकलन /शितकरण
- Slaughter House
  कत्तलखाना.
- Solvent extracting unit
  अर्क विद्रावक गट
- Solvent extracting plant equipped with pre cleaning of oil seeds or preexpelling of oil.
  तेलबिया स्वच्छ करणारे तथा तेलबियांचे पूर्ण तेल काढणारे अर्क विद्रावक गट.
- Solvent extracting and oil refining plant.
  अर्क विद्रावक आणि शुध्दीकरण कराणारा प्रभाग.
- Packaging
  आवेष्टन
- Relabeling (manufactured by third party under own packing and labeling )
  पूर्ण वेष्टन करणारे ( अन्य उत्पादकासाठी वेष्टीत व लेबलींग करणारे. )
- Importing
  आयातक

...२/--

- Storage/Warehouse/Cold Storahe
  साठा / वखार / शितगृह

- Retail Trade
  किरकोळ व्यापार

- Wholesale Trade
  घाऊक व्यापार

- Distributor / Supplier
  वितरक / पुरवठादार

- Transporter of food
  अन्न पदार्थ वाहतूकदार

- Catering
  रुचीभोज देणारे

- Dhabha or any other food vending establishment
  ढाबा किंवा इतर खाद्यपदार्थ विक्री संस्था

- Club / Canteen
  संघ / स्वयंपाक खोली.

- Hotel
  भोजन वसतीगृह.

- Restaurant
  उपहागृह.

- Other(s), please specify : ----------------------------------------------------------
  इतर व्यवसाय (व्यवसायाचे नाव लिहावे )

1. Name of the Company/ Organization :
   कंपनी /संस्थेचे नाव.
   ---------------------------------------------------------------------------------------------
   ---------------------------------------------------------------------------------------------

2. Registered Office Address :
नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

3. Address of Premise for which license is being applied.
परवानासाठी अर्ज केलेल्या जागेचा पत्ता.

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

4. Name and/or designation, qualification and address of technically qualified person in charge of operations as required under Regulation.
नियमानुसार तांत्रिक अर्हताधारण करणा-या व प्रभारी व्यक्तीचे नाव हुद्दा, शैक्षणिक पात्रता )

Name : नाव

Qualification : शिक्षण

Address : पत्ता

Telephone Number(S) : दूरध्वनी क्रमांक

Mobile No. (S) : भ्रूमणध्वनी क्रमांक

Email : इमेल

Photo Identity card no and expiry date : ओळखपत्र क्रमांक व मुदत

5. Name and / or designation, address and contact details of person responsible for complying with conditions of license ( if different from 4 Above ) परवाना अटींचे पूर्तता करणा-या व्यक्तींचे नांव / हुद्दा व पत्ता ( जर सदर व्यक्ती रकाना क्र. ४ मध्ये नमुद पेक्षा वेगळा असल्यास )

Name : नाव

Address : पत्ता

Telephone Number (S): दूरध्वनी क्रमांक

Mobile No. (S) : भ्रमणध्वनी क्रमांक

Email : इमेल

Photo Identity card no and expiry date ओळखपत्र क्रमांक व मुदत

6. Correspondence address ( if different from 3 above )
पत्रव्यवहाराचा पत्ता ( रकाना क्रमांक-३ मध्ये नमूद व्यतिरिक्त असल्यास )

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

7. Tel. No. (S) दूरध्वनी क्रमांक

Mobile No. (S) भ्रमणध्वनी क्रमांक

Email No. इमेल

Fax No.(S) फॅक्स क्रमांक

8. Food items proposed to be manufactured : उत्पादन करण्यात येणारे अन्न पदार्थांचे नांवे

| Sr.No.<br>अ.क्र. | Name of Food Item<br>अन्न पदार्थाचे नाव | Quantity in Kg per day or M.T. per annum<br>कि.ग्रॅ. प्रती दिन किंवा मेट्रीक टन प्रती वर्ष उत्पादन क्षमता |
|---|---|---|
| | | |

If required attach separate sheet आवश्यक असल्यास वेगळे विवरणपत्र जोडावे

If already having valid license – mention annual quantity of each food category manufactured during last three years .
जर यापूर्वी परवाना घेतला असल्यास मागील तीन वर्षात उत्पादीत केलेले प्रत्येक अन्न पदार्थाचे वार्षिक उत्पादन विवरण नोंदवावे.

9. Installed Capacity food product wise (per day )
प्रत्येक अन्न पदार्थ उत्पादनाची क्षमता (प्रती दिन )

10. For Dairy units दूध डेअरी करिता

(i) Location and installed capacity of Milk Chilling Centers (MCC )/ Bulk Milk Cooling Centers ( BMCS ) Milk Processing Unit / Milk packaging Unit in litres owned or managed by the applicant.
अर्जदाराने स्वतःचे किंवा केलेल्या व्यवसायाचे ठिकाण, दूध शितकरण केंद्र / मोठी दूध शीतकेंद्र / दूध प्रक्रिया केंद्र /दूध पॅकेजींग केंद्राची स्थापित क्षमता

| Sr. No.<br>अ.क्र. | Name of Food Item<br>अन्न पदार्थाचे नाव | Quantity in Kg per day or M.T. per annum<br>कि.ग्रॅ. प्रती दिन किंवा मेट्रीक टन प्रती वर्ष उत्पादन क्षमता. |
|---|---|---|
| | | |

If required attach separate sheet. आवश्यक असल्यास वेगळे विवरणपत्र जोडावे.

(ii) Average Quantity of milk per day to be used/ handled in
दूध हाताळण्याची क्षमता प्रती दिन

a. in lean season कृष कालावधी -----------------------------------
b. in flush season पृष्ठ कालावधी -----------------------------------

(iii) Milk products to be manufactured and their manufacturing capacity ( tones/year )
दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन व उत्पादनाची वार्षिक क्षमता (टर्न प्रतीवर्ष )

1) ----------------------

2) ----------------------

3) ----------------------

11. For Solvent Extracted Oil, De oiled meal and Edible Flour : ( सॉलव्हन्ट एक्ट्राक्टेड ऑईल,डी ऑईल मिल आणि इडीबल फलोअर/ अर्क विद्रावक आणि खाद्यपिठांसाठी )

(i) Details of proposed business.

प्रस्तावित व्यवसायाचे सविस्तर विवरण.

| Name of Oil bearing material | From seed or nut or cake | Crude | Solvent Extracted Oil, De oiled meal and Edible Flour | | | | | वनस्पती तेल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उदासिकरण व विरंजन | उदासिनीकरण केलेले | शुध्द केलेले | De oiled | तेल विरहित | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| तेलयुक्त पदार्थाचे नाव | बियापासून किंवा फळ बी / किंवा ढेप | कच्चे | स्खाद्यपिठ | | | | | व्हीजीटेबल ऑईल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | न्युट्रलाईजड व ब्लीच्ड | न्युट्रलाईजड मिल | रिफाईन्ड | डी ऑईल्ड | खाद्यपिठ | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

If already having valid license-mention annual quantity of each product manufactured during last three years. जर यापूर्वी परवाना घेतला असल्यास मागील तीन वर्षात उत्पादीत केलेले प्रत्येक अन्न पदार्थाचे वार्षिक परिमाण नोंदवावे.

ii) Name and address of factory or factories used by the miller or solvent extractor for processing oil bearing material produced or procured by him or for refining solvent extracted Oil produced by him.

ii) मिलर किंवा सॉलव्हन्ट एक्सट्रॅक्अरने तेल युक्त उत्पादीत पदार्थ किंवा त्यांनी उत्पादीत/संकलीत केलेले किंवा त्यांनी उत्पादीत केलेले रिफाईन्ड सॉलव्हन्ट एक्सट्रॅक्टेड ऑईल चा कारखाना / कारखान्याचे नांव आणि पत्ता.

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

12. Sanctioned electricity load or HP to be used . विज वितरण संस्थेने मंजूर केलेला विज दाब / वापरण्यासाठीची अश्वशक्ती.

----------------------------------------------------------------------------------------------

13. Whether unit is equipped with an analytical laboratory.
आस्थापनांत विश्लेषणासाठी प्रयोगशाळेची व्यवस्था आहे काय.

----------------------------------------------------------------------------------------

If yes the details hereof : ------------------------------------------------------------------------
असल्यास त्याचे विवरण

14. In case of renewal or transfer of license granted under other laws as per proviso to Regulation 5( 1 ) – period for which license required ( 1 to 5 years )
अधिनियम ५ (i ) अंतर्गत अनुज्ञप्तीचे नुतनीकरण असल्यास किंवा इतर कायद्या अंतर्गत घेतलेले अनुज्ञप्तीचे रुपांतरण असल्यास कालावधी ( १ ते ५ वर्षे )

15. I / We have forwarded a sum of Rs. ------------------------- towards License fees according to the provision of the Food Safety and Standards Regulations 2011 vide …….
मी / आम्ही आज रोजी अन्न सुरक्षा व मानदे कायदयांतर्गत अधिनियम २०११ अन्वये देय असलेले शुल्क रु. ----------------------- रक्कम या सोबत खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

Demand Draft No. ( Payable to ------------------------)
डिमांड ड्राफ्ट क्रमांक

स्थळ : ( Signature of the applicant/ authorized signatory )
दिनांक : अर्जदाराची सही.

# **प्र ति ज्ञा प त्र.**

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------- पिता / पत्नी

श्री. / श्रीमती ------------------------------------- रा. -------------------------------

--------------------------------------------------------------------------------------

प्रतिज्ञापूर्वक लिहून सादर व प्रगट करतो की, सोबत दिलेली सर्व माहिती व सादर केलेला तपशिल माझ्या माहितीनुसार सत्य व बरोबर आहे. तसेच मी लिहून देतो की, मी अथवा माझ्यामार्फत करीत असलेला / प्रस्तावित अन्न व्यवसाय हा अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६, नियमन २०११ मधील तरतुदींचे खात्रीपूर्वक पालन करेन व विशेषत्वे करुन अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण भारत सरकार किंवा त्यांच्या वतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने प्रसिध्द केलेल्या नोंदणी व परवानासाठीचे नियमन मधील परिशिष्ठ-४ मध्ये नमूद स्वच्छता व आरोग्यदायी पध्दती बाबत मार्गदर्शक तत्वांची वेळोवेळी पूर्तता करेन.

दिनांक :                                                         स्वाक्षरी.

जोडपत्र - २

**<u>राज्य किंवा/ केंद्रीय अनुज्ञप्ती अधिकारी यांच्याकडे नविन परवान्यासाठी अर्ज करतांना अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी.</u>**

१. मालक/भागिदार/अधिकृत व्यक्ती यांच्या सहीने पूर्ण भरलेला दोन प्रतीतील फॉर्म बी.

२. प्रक्रिया केंद्राची निलप्रत व नकाशा यामध्ये प्रत्येक प्रक्रिया प्रभागानुसार आखून दिलेल्या जागेचे क्षेत्र (परिमाण) मीटर/स्क्वेअर मिटरमध्ये.

३. संचालकांची यादी पूर्ण पत्ता व संपर्कासाठीचा तपशील

४. यंत्र व साधनसामुग्रीचे नांव त्यांची यादी ज्यामध्ये त्यांची संख्या व प्रतिष्ठापीत क्षमता, आणि वापरण्यात येणा-या विद्युत अश्वशक्तीचा तपशील

५. मालक/भागिदार/संचालक/अधिकृत व्यक्ती यांना सरकारी प्राधिकृत अधिका-याने दिलेले छायाचित्रयुक्त ओळखपत्र व अधिनिवासाचा पुरावा.

६. उत्पादन करू इच्छिणा-या अन्न पदार्थाचा (वर्गवारी) असलेली यादी (उत्पादकासाठी).

७. उत्पादकाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तिला दिलेले प्राधिकृत पत्र ज्यामध्ये नामनिदेर्शित व्यक्तिचे नांव व पत्ता असेल, त्या शिवाय जबाबदार पर्यायी व्यक्तिचे नांव व पत्ता व त्याला दिलेले अधिकार याचा उल्लेखासहीत, जो अन्न सुरक्षा अधिका-याला तपासणीच्या वेळी, अन्न नमुना घेतेवेळी पॅकिंग करतेवेळी, पाठवितेवेळी सहाय्य करेल.

८. घटक म्हणून वापरात येणा-या पाण्याचा विश्लेषण अहवाल (रासायनिक व जिवाणू सहीत ) जो मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत तपासावा व ज्यामध्ये अशा प्रयोगशाळेतील त्या प्रतिनिधीचे नांव ज्यांनी हा नमुना विश्लेषणास घेतला आणि तो नमुना घेतल्याची तारीख याचा उल्लेख असावा.

९. जागेचा अधिकृत कब्जा असल्या संदर्भातील पुरावा. (विक्री करारनामा, भाडे करारनामा, विद्युत बील ई.).

१०. भागीदार पत्राची प्रत/शपथपत्र/संस्थेची घटना प्रत.

११. सहकारी संस्थेसाठी सहकारी कायदा १८६१/बहुराज्य सहकारी कायदा २००२ अंतर्गत

प्राप्त प्रमाणपत्राची प्रत.

१२. पुनर्वेष्ठन करणा-यासाठी उत्पादकाचे "ना हरकत प्रमाणपत्र"

१३. अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली अथवा प्रमाणपत्र (असल्यास)

१४. दुध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रियाकर्त्यांसाठी दुधाचे उगमस्थान, दूध संकलनाचे ठिकाण अथवा दुध संकलन योजना, व नियोजन पध्दती

१५. मांस व मांस प्रक्रिया करणा-यांसाठी कच्च्या अन्न पदार्थांचे उगमस्थान.

१६. बाटलीबंद पिण्याचे पाणी उत्पादक/बाटलीबंद खनिजयुक्त पाण्याचे उत्पादक/किंवा कार्बोदकयुक्त जलपेय उत्पादकांसाठी पाण्याचा विश्लेषण अहवाल जो किटकनाशकाच्या अवशेषासाठी केलेला असावा व तो सार्वजनिक प्रयोगशाळो अथवा मानांकित प्रयोगशाळेकडुन प्राप्त करावा. तसेच नमुना संकलित करणा-या व्यक्तिचे नांव, दिनांक व नमुन्याचा उगम लिहिलेला व प्रक्रिया शाखेचे नांव त्यावर असणे अनिवार्य आहे.

१७. अन्न पदार्थांचे वितरण केलेल्या अन्न व्यवसायिकांसाठी, आवश्यक असेल त्या नुसार अन्न पदार्थ परत बोलावण्याची प्रणाली/पध्दत

१८. अन्न व्यवसायासाठी महानगरपालिका अथवा स्थानिक प्रधिकरण व प्रदूषण नियंत्रण कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र, औदयोगिक प्रभाग म्हणुन अधिसुचित केली नसलेल्या साठीच केवळ **सदरची नियमन लागू होण्यापूर्वी इतर कायद्यांतर्गत दिल्या गेलेल्या परवान्याच्या नुतनीकरण अथवा हस्तांतरण बदलासाठी लागणा-या कागदपत्राचा तपशील.**

१) पूर्वी मान्य परवान्यात सादर केलेली माहिति किंवा तपशीलात बदल झाला असल्यास -अशी माहिती.

२) अन्न सुरक्षा व्यवस्थापनाची प्रणाली अथवा त्याचे प्रमाणपत्र (केंद्र शासनाकडे परवान्यासठी अर्ज करणा-यानी अधिकृत संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.)

३) कामगारांची यादी तसेच ते वैद्यकियदृष्ट्या सक्षम असल्याबाबत वैद्यकिय प्रमाणपत्राच्या प्रती .

४) सक्षम तांत्रिक अर्हताधारक व्यक्तिचे नांव, शैक्षणिक अर्हता जो त्या विभागाचा कार्यकारी आहे .

परवान्यासाठीच्या अटी

सर्व अन्न व्यवसायीकांनी व्यवसायाच्या दरम्यान खालील अटींची पूर्तता होते अथवा नाही याची खात्री करणे आवश्यक आहे .

अन्न व्यवसायिकांना बंधनकारक आहे की-ते

१) व्यवसायाच्या दर्शनी भागात त्यांना मंजूर झालेला नमुना ('क') मधील परवाना अथवा त्याची सत्यप्रत लावतील .

२) परवाना अधिकारी अथवा त्यांच्यावतीने अधिकृत अधिका-यास अन्न व्यवसायीक त्यांच्या व्यवसायाच्या जागेत प्रवेश उपलब्ध करून देतील .

३) परवाना घेतांना असलेल्या स्थितीत अथवा स्वरूपात (व्यवसायात) बदल झाल्यास अशा बदलाबाबत प्राधिका-यास कळवतील .

४) कमीत कमी एक, तांत्रिक दृष्ट्या सक्षम असलेल्या व्यक्तीची ते नेमणूक करतील . ज्यांची कमीत कमी अर्हता रसायनशास्त्रातील; पदवी/बायोकेमिस्ट्री/ (फुड अन्न व पोषणमुल्य ॲण्ड न्युट्रीशन )/ सुक्ष्मजीवशास्त्रातील पदवी किंवा अन्न तंत्रज्ञान /दुग्धजन्य तंत्रज्ञान/दुग्धजन्य सुक्ष्मजीवशास्त्र/ दुग्धजन्य रसायनशास्त्र/दुग्धजन्य अभियांत्रिकी/खादयतेल तंत्रज्ञ/पशुविज्ञान शास्त्र/भोजनगृह व्यवस्थापन/ ऋचीभोज तंत्रज्ञ/अथवा इतर तत्सम अहर्ता असेलेली व्यक्ती .

५) अन्न व्यवसायिकांनी आवर्ती परतावा १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीसाठी ३१ मे पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. तर दूध व दुग्धजन्य

व्यवसायीकासाठी सहामाही व वार्षिक परतावा सादर करणे आवश्यक आहे. तसेच १ एप्रिल ते ३१ सप्टेंबर व १ ऑक्टोबर ते ३१ मार्च या कालावधीतील परतावा, अनुक्रमे ३0 नोव्हेंबर व ३१ मे पर्यंत सादर करणे बंधनकारक आहे .

६) परवाना अथवा नोंदणी प्रमाणपत्रात नमुद अन्न पदार्थांशिवाय कुठलाही अन्न पदार्थ सदर आस्थापनेमध्ये उत्पादन करणार नाहीत .

७) परिशिष्ठ ४ मध्ये नमुद अन्न व्यवसायाच्या प्रकारानुसार अन्न व्यवसायिकांनी अन्न आस्थापणेत स्वच्छता व आरोग्यदायक वातावरण ठेवावे .

८) अन्न उत्पादनाचा, कच्च्या अन्न पदार्थाचा वापराबाबत व विक्रीचा स्वतंत्र अभिलेखा प्रतिदिनी जतन करुन ठेवावा .

९) अन्न उत्पादनासाठी वापरण्यात येणारे कच्चे अन्न पदार्थ व त्यांचा स्त्रोत हा उच्चतम प्रतीच्या मानदानुसार असावा.

१0) अन्न व्यवसायिक त्यांच्या व्यवसायाच्या जागेत साठवत असलेले अन्न पदार्थ उत्पादन, किंवा विक्रीसाठीची जागा परवाना अधिका-याच्या समाधानाकारक खात्री इतपत तसेच मूतारी, संडास, गटारे, कचरा साठवण्याच्या जागेपासून दूर असावी .

११) वापरात येणा-या यंत्राची व मशीनची स्वव्छते विषयक पध्दत अवलंबिली आहे किंवा कसे याची खात्री करावी .

१२) ग्राहकास सुरक्षित अन्न पदार्थ देण्याच्या दृष्टीने तसेच धोक्याची शक्यतेचे निर्धारण करण्याच्या दृष्टीने प्रत्येक अन्न उत्पादकाने आपले अन्न पदार्थाचे रासायनिक किंवा सुक्ष्मजीवशास्त्रीय विश्लेषण अन्न सुरक्षा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अथवा राष्ट्रीय मानांकन बोर्डाव्दारा प्रमाणित प्रयोगशाळेतुन नियमित तथा किमानपक्षी ६ महिन्यातून एकदातरी करणे अनिवार्य आहे .

१३) पुरवठासाखळीमध्ये उगमापासुन ते शेवटच्या उपभोक्त्यापर्यंत त्यात शीतकरण, दळणवळण आणि साठा प्रक्रिया या सर्व ठिकाणी आवश्यक तापमान उपलब्ध राहिल्याची खात्री करावी .

१४) उत्पादन /आयातदार/वितरक यांनी अन्न पदार्थ खरेदी करतांना तो परवानाधारक/नोंदणीकृत विक्रेत्याकडून खरदी करावा आणि त्याबाबत तशा नोंदी ठेवाव्यात.

## इतर अटी

१. भोजनगृहाचे मालक, उपहारगृहे व इतर अन्न विक्रेता जे विक्री करतात अथवा विक्रीकरिता प्रदर्शित करतात अशा सर्वांनी शेवई गोडपदार्थ व इतर अन्न पदार्थ यांची यादी व ते कोणत्या तुपात अथवा तेलात अथवा वनस्पती किंवा इतर स्निग्ध पदार्थात तळले आहेत त्याचा तपशिल फलकावर नमूद करुन दर्शनी भागावर लावावा.

२. तयार व शिजविलेल्या अन्न पदार्थाचे विक्रेते त्यांनी विक्रीकरिता ठेवलेल्या अन्न पदार्थाचे स्वरूप सुचना फलकावर नमूद करावे.

३. प्रत्येक उत्पादक [खादयतेल घाणी चालक], लोणी, तूप, वनस्पती, खाद्य तेले, द्रावक अर्कीत तेल, तेल काढलेले पेंड, खाद्यपीठ आणि इतर कोणतेही स्निग्धपदार्थांचे विक्रेते यांनी नोंदणीवहित त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवहीत उत्पादित साठा, प्राप्त साठा, विक्री, वापरलेल्या तेल बियांचे स्वरूप, तेल काढलेल्या पेढींची मात्रा आणि वापरलेले खाद्यपीठ इत्यादी. तसेच त्यांचे कारखान्यातून पाठविलेला माल कोठे पाठविला ते ठिकाण, ई सर्व तपशिल असलेली नोंदवही ही अनुज्ञप्ती प्राधिकरण यांनी तपासणीवेळी मागितल्यास सादर करावी.

४. वनस्पती तेल, खाद्यतेले आणि त्यांची उत्पादने यांचे निर्माते /उत्पादक यांच्याकडे जर स्वतःची अद्ययावत पयोगशाळा चांचणीकरिता नसेलतर ते कायद्यांतर्गत परवाना घेण्यास पात्र नसतील.

५. प्रत्येक विक्री किंवा अर्क विद्रावक तेल/अर्धशुध्द/कच्च्या प्रतीच्या १ नंबर दर्जाचे शेंगदाणा खादय पेंड किंवा खाद्य नारळ पेंडचा साठा हे नोंदणी

केलेल्या वापरकर्त्यासच विक्री करतील आणि ते तिस-या व्यक्तिस विक्री करणार नाहीत .

६ . अर्क विद्रावक तेल, खादय शेंगदाणा पेंड किंवा खाद्य नारळ पेंड अथवा दोन्ही पदार्थ खरेदीवर जो नोंदीकृत वापर करणारा आहे त्याने त्यांच्या कारखान्यातच वापर करावा त्यांनी ते परत विक्रीसाठी अथवा इतर व्यक्तीच्या स्वाधीन करू नये .

उपरोक्त अटी खालील खाद्यतेलास लागु नाही .

(अ) करंजाचे तेल

(ब) कुसुम तेल

(क) महुआ तेल/मधूका तेल

(ड) लिंबाचे तेल

(इ) चींचुका वियाचे तेल

(ई) खादय शेंगदाणा पेंड ज्याला भारतीय मानक संस्थाव्दारे प्रमाणित/चिन्ह असेल .

(फ) खादय नारीयल पेंड ज्याला भारतीय मानक संस्थेव्दारे प्रमाणित/चिन्ह असेल .

७ . कोणत्याही अन्न व्यवसायिकाने खादयतेलाची विक्री किंवा वितरण किंवा विक्रीच्या इरादयाने साठवणुक किंवा पाठविणे किंवा देते वेळी असे खादयतेल नियमनांच्या अधिन राहून त्यावरील मजकुर (लेबल) व वेष्ठीत (पॅकड) केल्याची खात्री करुनच देईल/विक्री करेल तथापी याला अपवाद ज्या विशिष्ठ घटना किंवा कालावधीत अन्न सुरक्षा आयुक्तांनी निर्देशित केल्यानुसार व तसे अधिसुचित करुन परवानगी दिल्यास करता येईल, सर्व विवक्षित वेळी त्याची कारणमिंमासा नोंदविण्यात येईल.

# शपथपत्र

मी श्री / श्रीमती .......................................................................... वय............... वर्ष ......... आणि राहणार ........................................................................................ प्रतिज्ञापुर्वक खालीलप्रमाणे घोषीत करतो / करते.

१. मी, (मालक/ भागीदार/संचालक) ज्यांचे कार्यालय / उद्योग चालविण्याचे नोंदणी कार्यालय ...................................................................................... या जागी आहे.

२. मी, अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ व नियम २०११ या अंतर्गत अन्नपदार्थाचा लहान उत्पादक /लहान किरकोळ विक्रेता/फेरीवाला/फीरस्ता/ हंगामी टपरीधारी/ फिरता अन्न विक्रेता / घरगुती खाणावळवाला / डब्बेवाला / प्रक्रीया करणारा / पुर्नवेष्टन करणारा / धार्मिक संमेलनासाठी असणारा / जत्रेतील अन्न आस्थापना धारक / दुध उत्पादक ( जो दुध सहकारी संघाचे सभासद नाही असे) / दुध विक्रेता / ढाबा / इतर असुन माझी या अन्न उद्योगाची वार्षिक उलाढाल रु.१२/- लाखापैक्षा जास्त नाही.

३. माझ्या आस्थापना / फर्म / कंपनी याची वार्षिक उलाढाल ज्यावेळेस रु.१२/- लाखापेक्षा जास्त होईल त्यावेळेस ही बाब मी संबंधीत नोंदणी प्राधिकारी यांना त्वरीत कळविण आणि अनुज्ञ प्तीसाठी संबंधित प्राधिकारी यांचेकडे अर्ज करीन.

४. माझ्या फर्म / कंपनीचा पॅन क्रमांक ............................ आणि टॅन ..........................क्रमांक असा आहे.

५. मला याची पुर्णपणे जाणीव आहे की, हे केवळ नोंदणी प्रमाणपत्र असुन अनुज्ञप्ती नाही सदर नोदणी प्रमाणपत्राद्धारे मला कुठलाही मालमत्ता हक्क तसेच जमीनी अथवा वास्तु संबंधी किंवा कुठल्याही बाबतीत मालकी हक्क प्रदान होत नाही.

६. मी हमीपुर्वक लिहुन देतो की, माझ्या व्यवसायाची जागा ही स्थानिक प्राधिकारी यांनी प्रमाणित केलेली आहे, सदर जागेमुळे वाहतुकीस कुठल्याही प्रकारचा अडसर, किंवा पादचा-यांना त्रास होणार नाही तसेच ही जागा अनारोग्यनगरी परिसरापासुन दुर आहे.

७. मी पुढे असेही हमीपुर्वक लिहुन देतो की, जो अन्न व्यवसाय सुरु करणार आहे किंवा करण्याचे योजिले आहे, हा व्यवसाय अन्नसुरक्षा व मानदे कायदा, नियमन व त्यांचेशी संबंधित सर्व उपनियम यांचेमध्ये दिलेल्या मानदानुसार असेल आणि विश्लेषणाने ज्या मार्गदर्शक सुचना स्वच्छता व आरोग्यकारक बाबींशी निगडीत आहेत व ज्या नोंदणी आणि अनुज्ञप्ती नियमन अंतर्गतच्या परिशिष्ट ४ मध्ये भारतीय अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकारी यांचे मार्फत अथवा त्यांचे मार्फत प्राधिकृत व्यक्ति कडुन निर्गमित
झालेल्या आहेत

## पडताळणी

वरील प्रमाणे परिच्छेद क्र.१ ते ७ मधील सर्व माहिती प्रतिज्ञापुर्वक सत्य व बरोबर आहे. वरील प्रमाणे माझ्या तर्फे प्रतिज्ञापुर्वक देण्यात आलेली माहिती ही खोटी आढळुन आल्यास कायद्यानुसार कार्यवाहीसाठी मी पात्र ठरेन.

नोटरी यांची सही व शिक्का                                                                                अर्जदाराची सही.

# घोषणापत्र

मी श्री / श्रीमती / कु. ..................................................................... मुलगा / मुलगी

श्री. .................................................................................................. यांचा / यांची

राहणार ....................................................................................... प्रतिज्ञापुर्वक घोषीत करतो की, माझ्या तर्फे देण्यात आलेली माहिती वस्तुस्थितीनुसार सत्य व बरोबर आहे. मी पुढे असेही घोषीत करतो की, जो अन्न व्यवसाय सुरु करणार आहे किंवा करण्याचे योजिले आहे, हा व्यवसाय अन्नसुरक्षा व मानदे कायदा, नियमन व त्यांचेशी संबंधित सर्व उपनियम यांचेमध्ये दिलेल्या मानदानुसार असेल आणि विश्लेषणाने ज्या मार्गदर्शक सुचना स्वच्छता व आरोग्यकारक बाबींशी निगडीत आहेत व ज्या नोंदणी आणि अनुज्ञप्ती नियमन अंतर्गतच्या परिशिष्ट ४ मध्ये भारतीय अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकारी यांचे मार्फत अथवा त्यांचे मार्फत प्राधिकृत व्यक्ति कडुन निर्गमित झालेल्या आहेत.